आज़ादी का अमृत महोत्सव

# पालघर जिल्हा परिषद स्पॉटलाईट

पुढारी MY पालघर | सोमवार, ७ फेब्रुवारी २०२२ | ४

# विकासाचा गतिमान टप्पा

**पालघर जिल्हा परिषदेने भारतीय स्वातंत्र्याच्या गौरवशाली अमृत महोत्सव वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे औचित्य साधून अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचे नवनवे संकल्प सोडले आहेत. प्रामुख्याने घरोघरी पाणी, साखळी बंधारे, शाळांना संरक्षक भिंती, दिव्यांगांचे सर्व्हेक्षण, कुपोषणमुक्ती, आदर्श घरांची निर्मिती, कर्मचाऱ्यांसाठी आनंदी निवृत्ती/आश्वासित प्रगती योजना, महिलांसाठी गोट बँक, तारांगण प्रकल्प, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, सार्वजनिक शौचालय, शिक्षण विकास, अत्याधुनिक काजू प्रक्रिया प्रकल्प आदींचा उहापोह करण्यात आला आहे.**




**सिद्धराम सालीमठ,** मुख्य कार्यकारी अधिकारी (भाप्रसे), जिल्हा परिषद, पालघर

मंगेश तावडे

## पालघर जिल्ह्यात ७५ साखळी बंधारे

जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत ७५ साखळी बंधारे बांधण्यात येत असून त्यासाठी जिल्हा नियोजन विकास निधीतून खर्च होणार आहे. विशेषत: जव्हार, मोखाडा या दुर्लक्षित भागात पाणी उपलब्ध करून देणे असा साखळी बंधारे बांधण्याचा उद्देश असून जेणेकरून आदिवासी बाधवांना तिथल्या तिथे काम मिळेल. लोकांचे स्थलांतर थांबेल. पाणी उपलब्ध झाले तर पर्यावरणपूरक वातावरण मिळेल आणि आदिवासींचे जीवन बदलेल.

## अत्याधुनिक काजू प्रक्रिया प्रकल्प

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय रुरबन योजनेंतर्गत जव्हार तालुक्यातील कासटवाडी येथे गावसमूहाच्या विकासासाठी काजू प्रक्रिया उद्योगाची स्थापना करण्याचे विचाराधीन आहे. ९० लाख रुपये किमतीच्या या प्रकल्पासाठी १५ जणांना प्रत्यक्षरीत्या रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच कामासाठी सुमारे १५०० महिलांनाही रोजगाराचे साधन निर्माण होणार आहे. या काजू प्रक्रिया उद्योगामुळे महिला बचतगटांनाही काम मिळणार आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ मिळवून देणे, महिलांचे सबलीकरण, रोजगार निर्मिती, आर्थिक सुधारणांमध्ये मदत होणार.

## दिव्यांगांचेही ॲपद्वारे सर्वेक्षण

जिल्ह्यातील दिव्यांगांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी एक ॲप तयार करण्यात आले असून दिव्यांगांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. ॲपचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. ग्रामीण व आदिवासी भागामध्ये दिव्यांग व्यक्ती मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु, यामधील बहुतांश जणांकडे दिव्यांग असल्याबाबतचा दाखला नाही. त्यामुळे या व्यक्तींना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ मिळत नाही. महिला व बालविकास विभागाच्या अंगणवाडी सेविका, प्रत्यक्ष ग्रामीण स्तरावर काम करीत असल्यामुळे जिल्ह्यातील दिव्यांग शोधमोहिमेसाठी मदत घेवून ॲपद्वारे माहिती संकलित करण्यात येत आहे. यामध्ये एकूण १६५८ दिव्यांग महिलांची माहिती एकत्रित वर्गीकरणासह तयार झाली आहे. अजून सर्व्हेक्षण व नोंदणी सुरू आहे.

## मनरेगा कृतिसंगम : ५०० शाळांना संरक्षक भिंत

पालघर जिल्हा परिषदेच्या ५०० शाळांना संरक्षक भिंत उभारण्यात येणार आहे. या शाळांच्या सभोवताली आरसीसी पद्धतीचे कुंपण घालण्यात येणार आहे. जेणेकरून वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष, बाग बगिचा, क्रीडांगणे सुरक्षित राहण्यासाठी या कुंपणांमुळे फायदा होणार आहे. एकंदरीत प्रकल्पासाठी ७९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून १७६ शाळांसाठी पंधरावा वित्त आयोग, पेसा अंतर्गत १३ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला. १५८ शाळांसाठी जिल्हा नियोजन विकास निधीतून ७ कोटींची मागणी, १३८ शाळांसाठी १७ कोटी सीएसआर फंडातून मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व शाळांच्या कामांसाठी मनरेगाच्या माध्यमातून स्थानिक मजुरांच्या हाताला काम देण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे.

## कुपोषण मुक्तीसाठी प्रयत्न

आरोग्य विभाग व महिला आणि बालविकास योजनेंतर्गत जोखमीच्या मातांकडे विशेष लक्ष पुरविण्यात येत आहेत. गरोदरपण निश्चित झाल्यापासुन ते प्रसुतीपर्यंत पोषण आहार, आरोग्य सुविधा, अतिरिक्त सुविधा पुरविणे. जव्हार आणि मोखाडा या दोन तालुक्यांवर विशेष लक्ष देवून आदिवासींच्या आहाराचा समतोल राखणे, जेवणात तेलाचा समावेश करणे, वेळच्या वेळी तपासणी करणे, गरोदरमातांना सशक्त करण्याचा यामागचा उद्देश आहे. नेहमीप्रमाणे एपीजे अब्दुल कलाम योजनेंतर्गत अमृत आहार योजनेचा फायदा, तसेच शासनाकडून कोणत्याही प्रकारची कमतरता भासू न देणे, स्थलांतरित वीटभट्टीवरील आरोग्य तपासणी, अंगणवाडी ताईंमार्फत आजारी मुलांना उपचारासाठी पाठविणे, तसेच वीटभट्टीवर सोयीसुविधा देणेबाबत मालकांनाही प्रशासनाच्यावतीने विशेष सूचना देण्यात आल्या. रोजगार हमी आणि वीटभट्टीवरील कामगारांची ई- श्रम नोंदणी महिला आणि बालविकास विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे. या सर्वांचा परिपाक म्हणून पालघर जिल्ह्यातील कुपोषण कमी करण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील ३५ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कायाकल्प योजनेंतर्गत गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे नियोजित आहे.

## ग्रामीण विकास यंत्रणा : आदर्श घरांची निर्मिती

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना : ग्रामीण अंतर्गत २५६५७ उद्दिष्ट प्राप्त. त्यापैकी २५६३९ घरकुलांना मंजुरी देवून २३५९७ घरकुले पूर्ण. तसेच राज्य पुरस्कृत योजने (शबरी, रमाई व आदिम) मध्ये ६३६६ उद्दिष्ट प्राप्त. त्यापैकी ६३४४ घरकुलांना मंजुरी देवून ५२६५ घरकुले पूर्ण करण्यात आली. ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी महाआवास ग्रामीण अभियानांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करणे, योजनेची १०० टक्के मंजुरी, मंजूर ८३८ घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण, २३५८ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण, ३९० जणांना ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, प्रत्येक पंचायत समिती ठिकाणी डेमो हाउसेस, विविध वस्तूंना मार्केट स्पेस उपलब्ध करून देण्यासाठी कॉप शॉपचे काम प्रगतिपथावर असून कायमस्वरुपी प्रतीक्षा यादीतील २२५४४ लाभार्थ्यांचे आधार सिडिंग, आवास प्लसमधील १०७४४८ लाभार्थ्यांचे आधार सिडिंग/जॉबकार्ड मॅपिंग तसेच घरकुलांसोबत लाभार्थ्यांना मग्रारोहयोमधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन ग्रामीणमधून शौचालय, जलजीवन मिशनमधून पाणीपुरवठा, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना गॅस जोडणी, सौभाग्य योजनेतून विद्युत जोडणी, उमेद लाभ देण्याचे काम प्रगतिपथावर आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत रोटरीच्या सहकार्याने वाडा तालुक्यामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये ३२६ आदर्श घरांची निर्मितीसाठी आशियाना प्रकल्प राबविण्यात येत आहे. याची दखल राज्यस्तरावरून घेण्यात आली. जव्हार तालुक्यातील आदिम योजनेतील कातकरी समाजातील लाभार्थ्यांना घरकुलांकरिता जागा उपलब्ध करून त्यांची हौसिंग कॉलनी तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

## माझी वसुंधरा




पालघर जिल्हा परिषदेच्या ३३७ ग्रामपंचायतींनी माझी वसुंधरा २.० या अभियानात सहभाग दर्शविला असून त्यांनी भूमि, जल, वायू, अग्नि आणि आकाश संदर्भात विविध कार्य पार पडली आहेत. यामध्ये वृक्षलागवड, जलसंधारण, जैवविविधता, घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिक बंदी, हागणदारीमुक्त, दर्जा राखणे, कंपोस्ट खत बनविण्यास प्रोत्साहन देणे, बायोगॅस निर्मिती, उज्ज्वला गॅस कनेक्शन, सणांच्या दरम्यान मूर्ती हिसर्जनासाठी कृत्रिम टँकचा वापर करून पाण्याचे प्रदूषण टाळणे, सौरउर्जेचा वापर करून वीज बिल कमी येण्यास मदत करणे आदी कामांचा समावेश यामध्ये होतो.

## आनंदी निवृत्ती/आश्वासित प्रगती योजना

सन २०२१ मध्ये एकूण ६७ शिक्षकेतर कर्मचारी व १९१ शिक्षकांना नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ देण्यात आला. तसेच सामान्य प्रशासन विभागातील १० ते १२ वर्ष झालेले १२५, १२ ते २४ वर्षांचे ४९ तसेच ३० वर्षे पूर्ण झालेल्या एकूण २५ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला. सामान्य प्रशासन विभाग २४, महिला बालविकास ४, बांधकाम ६७, पशुसंवर्धन ४८ कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्राचा लाभ देण्यात आला आहे. पदोन्नती, अनुकंपा भरतीसारखा प्रलंबित असलेला प्रश्न दावे/हरकती आल्याने अंतिम यादी लवकरात लवकर तयार करण्याचा मानस आहे. २६ संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी देखील पूर्ण करण्यात आली आहे.

## महिला बचतगटांमार्फत गोट बँक : राज्यात अव्वल

जव्हार आणि तलासरी तालुक्यात प्रत्येकी २ या प्रमाणे एकूण ४ गोट बँक प्रस्ताव मंजूर करण्यात आले. बचतगटांच्या महिलांना शेळीपालनामध्ये माफक किमतीमध्ये गाभण शेळी उपलब्ध करून शेळी संगोपन/पालनातून आर्थिक समृद्धी येण्यासाठी अकोला जिल्ह्यातील कारखेडा गावातील गोट बँकेशी करारनामा करून प्रकल्प राबविण्यात येणार आहे. एका गोट बँक प्रकल्पामध्ये १०० महिलांना शेळीपालनासाठी अकराशे रुपयांची एक गाभण शेळी देण्यात येणार आहे. त्या बदल्यात त्या लाभार्थ्याने शेळीच्या चार करड्यांच्या स्वरुपात उर्वरित रक्कम जमा करणे अपेक्षित आहे. या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येणार असून या प्रकारचा पालघर जिल्हा परिषदेमार्फत राज्यातील पहिला प्रकल्प ठरणार आहे.

## जलजीवन मिशन अंतर्गत घरोघरी पाणी देणार

प्रतिमाणशी ५५ लिटर हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून हर घर जल योजना राबवून २०२४ पर्यंत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. विभागीय पाणीपुरवठा आणि राज्य स्तरावरून एनजीएसच्या मदतीने सर्व्हेक्षण सुरू आहे. सर्व्हेक्षण प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहे. पालघर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या आणि शाळांना शुद्ध पाणीपुरवठा देण्याचे काम सुरू आहे. ८० टक्के शाळांना पाणी देण्यात आले असून उर्वरित २० टक्के शाळा प्रगतिपथावर आहेत. प्रत्येक गावामध्ये महिलांमार्फत पाणी गुणवत्ता तपासणी होणार असून आजअखेर २९ गावांमध्ये हर घर जल पूर्ण झाले आहे. तसेच पालघर जिल्ह्यातील ११७२७ पाणी स्त्रोतांपैकी ११३०६ (९६.४१ %) इतके पाणी नमुने गोळा करुन रासायनिक तपासणीसाठी उपविभागीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले.

## तारांगण प्रकल्प प्रस्तावित

जव्हार तालुक्यातील कासटवाडी येथे रुरबन प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना खगोलशास्त्र दृष्टिकोनातून आवड निर्माण होण्यासाठी तारांगण प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. त्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राविषयी माहिती मिळेल आणि जव्हार पॉईंटचेही खगोलशास्त्राने पर्यटन घडू शकणार आहे.



# ड्रोनद्वारे लस वाहतूक

### महाराष्ट्र राज्यातील पहिला प्रकल्प यशस्वी

**१** आपत्कालीन परिस्थितीत रक्त, आपत्कालीन औषधे आणि अवयवांची वाहतूक करण्यासाठी तसेच इतर आपत्कालीन सेवांसाठी ड्रोनद्वारे कोरोना प्रतिबंधक लस वाहतूक करण्यात आली. सुरुवातीची रन राजीव गांधी स्टेडियम जव्हार येथून ७० मिनिटांच्या रस्त्याने जाण्यासाठी होती. ज्याला ९:३० मिनिटे लागली.

**२** या ड्रोनचे वेगळेपण म्हणजे त्याची पेलोड क्षमता ५ कि. मी. आहे आणि ते २५ ते ३० मी. पर्यंत जाऊ शकते. पूर्णपणे स्वदेशी (मेक इन इंडिया) कनेक्टिव्हिटी समस्यांमुळे आणि साठवण्याच्या सोयीमुळे पारंपरिक मार्गाने लसींची वाहतूक करणे अडचणीचे होते. परंतु या ड्रोनद्वारे नियुक्त ११ गावांमध्ये एका दिवसात सुमारे १५० ते २०० कुपी सहजपणे पोहोचवल्या गेल्या. हा महाराष्ट्र राज्यातील पहिला प्रकल्प यशस्वीरीत्या पार पडला.यापुढे रक्त, आपत्कालीन औषधे आणि अवयवांची वाहतूक करण्यासाठी इतर आपत्कालीन सेवांसाठी ड्रोनचा वापर केला जाईल.

## बिरसा मुंडा कृषी क्रांती



पालघर आदिवासी बहुल जिल्ह्यात शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सिंचन विहिरी व सिंचन साहित्य पुरवठा करण्यासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सन २०१७-१८ पासून राबविली जात आहे. या योजनेत नवीन विहीर खोदणे, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळे अस्तरीकरण, या अनुषंगाने सिंचन साहित्य लाभ मिळविणे, या योजनांमुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बारमाही सिंचनाखाली येण्यास मदत झाली आहे. आदिवासी शेतकऱ्यांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावला आहे. खते, बियाणे, कीटकनाशके यांचा जिल्ह्यामध्ये विविध कंपन्यांमार्फत पुरवठा होत असतो. खते, बियाणे व कीटकनाशके यांच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबत विभागामार्फत काम केले जाते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा उपलब्ध होण्यास मदत होते. गेल्या तीन वर्षांमध्ये ११०८ नवीन विहिरी निर्मिती तसेच जुनी विहीर दुरुस्ती कामे हाती घेतली.

## शिक्षण विकास : नाविन्यपूर्ण उपक्रम - योजना

**शाळांना गुणवत्तापूर्ण होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत. यात डाएट व प्राथमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच युनिसेफ, सीके, प्रथम, महिंद्रा कोटक, मुथा-नांदी-संपर्क फौडेशन अशा विविध संस्था व गुणवत्तापूर्ण बनविण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रम राबविण्यात येतात.**

**१ मुलींसाठी गुणवत्तापूर्ण उपक्रम :** नांदी मार्फत नन्ही कल्ली राबविण्यात आले. याचा फायदा पालघर आणि डहाणू तालुक्यातील ६३१३ मुली, २५० शिक्षक तसेच १६२२ पालकांना मिळत आहे. २४० टॅबच्या माध्यमातून मुलांना शिक्षण देण्यात येते. गणित व इंग्रजी कीट वाटप व रेडिओ डिव्हाईस ९९ जि. प. शाळांमध्ये उपक्रम सुरू असून ६५४३ विद्यार्थी व २४७ शिक्षक या उपक्रमाचा फायदा होत आहे.

**२ बालरक्षक चळवळ :** ३२९७ शाळांमधून बालरक्षक कार्यरत आहेत. २२८५ शाळाबाह्य मुलांमधून २२०३ मुले शाळेत दाखल झाली. तर उर्वरित ८२ मुलांना दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मिशन आयएसओ प्रोजेक्टमध्ये ६९ शाळांपैकी १० शाळांना आयएसओ प्रमाणपत्र देण्यात आले.

**३ निष्ठा प्रशिक्षण :** प्रत्येक घटक व विषयांचे प्रशिक्षण देण्यासाठी ६६५५ कर्मचारी सहभागी झाल्या आहेत. शाळा सिद्धी अंतर्गत ३२३५ शाळांचे स्वयंमूल्यमापन पूर्ण झाले. पालघर जिल्ह्यात ११८४ शाळांचा सिद्धी स्वयंमूल्यमापनामध्ये देशात प्रथम क्रमांक आला असून विविध संस्थांकडून प्रोजेक्टर१०९, टॅब ३३२ आणि ३१४ मोबाईलचे वाटप करण्यात आले.

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन



स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सन २०१४ पासून ते आजपर्यंत जिल्ह्यात पायाभूत सर्व्हेक्षणातून १३२१३५, सुटलेले अंतर्गत १०५६१, अंतर्गत १३६२६ व नवीन लाभार्थी अंतर्गत ३८७२ अशा एकूण १,६०,१९४ कुटुंबांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केले आहे. सन २०२१-२२ च्या वार्षिक कृती आराखड्यानुसार केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन करण्यात आलेल्या २७९६ कुटुंबांनी मार्च २०२२ अखेर वैयक्तिक शौचालय बांधकामे करावयाची आहेत. तसेच जिल्ह्यात अनेक योजना प्रगती पथावर असून पाणी योजनांवर अधिक भर देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात पर्यावरणपूरक वातावरण मिळेल आणि आदिवासींचे जीवन बदलेल.

## सार्वजनिक शौचालय बांधकाम



जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावरील वैयक्तिक शौचालय नसलेले कुटुंब, वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेले कुटुंब, गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, यात्रास्थळे व पर्यटनस्थळे अशा ठिकाणी सन २०१७-१८ मध्ये ९२, सन २०१८-१९ मध्ये ५८ व सन २०२१-२२ मध्ये ३७ अशा एकूण १८७ सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे. सन २०२१-२२ च्या वार्षिक कृती आराखड्यानुसार १३५ नवीन सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

## घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन



गावपातळीवरील सांडपाणी व घनकचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत एकुण ४७५ गावांचे आराखडे व अंदाजपत्रके बनविण्याकरिता १५ व्यावसायिक संस्थांची निवड जिल्हास्तरावरुन करण्यात आली असून सद्यस्थितीत ४७५ पैकी ४४८ गावांचे आराखडे व अंदाजपत्रके तयार झाले असून ३४२ कामांना तांत्रिक मान्यता व २९६ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत.

## १०० दिवस धडक कार्यक्रम



स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण महाराष्ट्र सन २०२४-२५ पर्यंत हागणदारीमुक्त अधिक म्हणून जाहीर करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या करिता १०० दिवसात एक ठोस कार्यक्रम आखून जास्तीत जास्त उद्दिष्ट साध्य करणे आणि त्या अनुषंगाने निधी खर्च करण्याची कार्यवाही करणेचे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यानुषंगाने २७९६ वैयक्तिक शौचालय बांधकाम, १३५ सार्वजनिक शौचालय बांधकाम, शौचालयांचे (एक शोषखड्डा शौचालयाला दुसरा शोषखड्डा करणे), घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत निवडलेल्या जिल्ह्यातील ४७५ गावांत कामे पूर्ण करणे, नव्याने तयार करावयाचे शोषखड्डे, नाडेप व कंपोष्ट खड्डे इ. लक्षांक शासनाने ठरवून दिलेल्या १ डिसेंबर, २०२१ ते १० मार्च, २०२२ या कावधीत पूर्ण करावयाचे आहे.

## जव्हारमध्ये सामुदायिक शेततलाव : राज्यात पहिला प्रकल्प



मनरेगा अंतर्गत जव्हार तालुक्यात डोंगरपठारावर सामुदायिक शेततलावाची निर्मिती करण्यात येत असून त्या ठिकाणी सुमारे १ कोटी लिटर पाणी साठवण क्षमता असणार आहे. महाराष्ट्र राज्यातील हा पहिलाच प्रकल्प असून त्या पाण्यावर आंबा / काजूच्या सुमारे ५५०० वृक्षांचे सुमारे ५० हेक्टरवर रोपण करण्यात आले आहे. भविष्यात या सामुदायिक तलावात मत्स्यसंवर्धन करून त्यातील माशांचा उपयोग बचतगटांमार्फत कुपोषित बालकांना आहार म्हणून देण्याचे नियोजन आहे.

